# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/प्रमाणसंहिता अमंलबजावणी/२०२१/640 दिनांक १२.२.२०२१.

**तात्काळ/महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान,
विधी, शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **प्रयोगशाळा परिचर/ग्रंथालय परिचर कर्मचा-यांना प्रमाण संहिता १९८४ प्रमाणे कामकाज करणेबाबत..**

संदर्भ - अध्यक्ष, पुणे विभागीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे पत्र क्र. संघ/२७/२०२१ दि. १२.२.२०२१.

पुणे विभागीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ, यांच्यासोबत दिनांक १२.२.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संघाच्या प्रतिनिधीनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, महाविद्यालयातील अनुदानित विभागाकडे काम करणारे प्रयोगशाळा परिचर / ग्रंथालय परिचर या कर्मचा-यांना महाविद्यालयातील प्रयोगशाळा व ग्रंथालयातील कामकाजा व्यतिरिक्त इतर कामे दिली जातात. उदा. रात्रपाळी, माळीकाम, खोल्या साफसफाई इ. कामे करुन घेतली जातात. व प्रयोगशाळा परिचर यांना दिर्घसुटटया दिल्या जात नाहीत अशा तक्रारी संघटनेकडे प्राप्त झालेल्या आहेत असे संघटनेने कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

तरी महाविद्यालयातील अनुदानित विभागाकडे काम करणारे प्रयोगशाळा परिचर / ग्रंथालय परिचर या कर्मचा-यांना प्रमाणसंहिता १९८४ मधील फॉर्म नं. ५ मधील विभिन्न कर्मचा-यांची कामे व जबाबदा-यामध्ये उल्लेख केलेल्या नुसार कामाचे वाटप करण्यात यावे.

(डॉ. मोहन खताळ)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.